# विद्यापीठाचा इतिहास डोळ्यासमोर ठेवा

## जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठात 'शिवमहोत्सव' उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती राजाराम महाराज आणि राजाराम महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बाळकृष्ण यांच्या संकल्पनेतून आणि माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण, माजी मंत्री बाळासाहेब देसाई यांच्या प्रेरणेतून हे शिवाजी विद्यापीठ सुरू झाले आहे. या विद्यापीठास फार मोठा इतिहास आहे. हा इतिहास आपण डोळ्यांसमोर ठेवून पुढील वाटचाल करावी, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे रविवारी लोककला केंद्र सभागृहात 'शिवमहोत्सव' या सांस्कृतिक कार्यक्रमात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव जीवनगौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले. आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**पवार म्हणाले, विद्यापीठाची स्थापना १९६२ साली झाली. १९६४ साली मी एम.ए.ची पदवी घेतली. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी मला या क्षेत्रात आणले;** म्हणूनच मी हा पुरस्कार अप्पासाहेब पवार यांच्या स्मृतीला अर्पण करतो.



शिवाजी विद्यापीठात रविवारी विद्यार्थी कृती समितीच्या 'शिवमहोत्सव' कार्यक्रमात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव जीवनगौरव' पुरस्कार आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. प्रवीण कोडोलीकर, महेश काकडे, महेश पाटील, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते.

### अपना भी दिन आयेगा : सतेज पाटील

आमदार सतेज पाटील यांनी आपल्या भाषणाचा शेवट करताना एका हिंदी चित्रपटातील संवाद पेश करीत 'अपना भी दिन आयेगा' असे म्हणताच उपस्थित तरुणाईने टाळ्या व शिट्ट्यांच्या गजरात त्याला दाद दिली.

### 'सांस्कृतिक संध्या' कार्यक्रमाने रंगत

'सांस्कृतिक संध्या' कार्यक्रमाची सुरुवात श्वास अकॅडमीच्या कलाकारांनी गणेश वंदनाने केली. रसूलभाई मुल्लाणी यांनी बासरीवादन केले. राजारामियन ग्रुपने संगीतकार अजित-अतुल यांची गीते सादर केली. सार्थक क्रिएशनतर्फे फ्युजन नृत्य सादर केले. भूषण साटम याने गिटारवादन केले.

आमदार सतेज पाटील म्हणाले, आजची पिढी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त होत आहे. भविष्यातील गरजा ओळखून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वाटचाल करावी.



याप्रसंगी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना 'शिव ताराराणी' पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी महोत्सवाची भूमिका स्पष्ट केली.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, किशोर माने, अखिल भारतीय मराठा महासंघ विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ऋतुराज माने, मनसे विद्यार्थी संघटनेचे मंदार पाटील, रोहित पाटील, सचिन मांगले विद्यार्थी उपस्थित होते.

# हा तर विद्यापीठाने दिलेल्या संस्कारांचा गौरव

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठात शिकत असताना डॉ. आप्पासाहेब पवार या गुरुवर्यांनी इतिहासाची गोडी लावल्याने इतिहास संशोधनात कार्य करू शकलो. माणूस म्हणून घडविणाऱ्या विद्यापीठाने दिलेल्या संस्काराचा गौरव शिव जीवनगौरव पुरस्काराने झाला याचे मोठे समाधान आहे,' असे भावोद्गार ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी काढले.

**शिव महोत्सवात डॉ. जयसिंगराव पवार यांचे भावोद्गार**

शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थी संघटना कृती समितीच्या वतीने आयोजित शिव महोत्सवात डॉ. पवार यांना आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते शिव जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. पवार बोलत होते.

अमित गद्रे



**शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे शिव महोत्सवांतर्गत शिव जीवनगौरव पुरस्कार डॉ. जयसिंगराव पवार यांना प्रदान करताना आमदार सतेज पाटील. डावीकडून डॉ. प्रवीण कोडोलीकर, डॉ. सरदार जाधव, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. आर. जी. कोरबू, आदी.**

ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना आमदार पाटील यांच्या हस्ते शिव ताराराणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनाही यावेळी पुरस्कृत करण्यात आले. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात रविवारी झालेल्या या महोत्सवात आजी-माजी विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करत जल्लोष केला.

डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, 'महोत्सवातून चांगल्या कार्याला चालना दिली जात आहे. शिक्षण क्षेत्रातील कार्याला शिव ताराराणी यांच्या नावाने असलेल्या या पुरस्कारामुळे अधिक बळ मिळाले आहे.' आमदार सतेज पाटील म्हणाले, 'भविष्यात ६० टक्के नोकऱ्या कमी होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उद्योजकतेकडे वळावे.'

सुरुवातीला ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर आणि युवा कलाकार कोणार्क शर्मा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. श्वास ॲकॅडमीच्या कलाकारांनी गणेशवंदना करून प्रारंभ केला.

डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## पुरस्कारप्राप्त

सागर बगाडे, ओंकार शेटे, दीपक बिडकर यांना शिव सन्मान पुरस्कार देण्यात आला. सागर चौरे, विकास मोहिते, शोभा पुरेकर, सतीश केसरकर, दीपक काशीद, विजय माळी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. संभाजी शिंदे, शिवाजी मोरे यांना शिव पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोहित कोळेकर यांना शिव युवा उद्योग पुरस्कार देण्यात आला. अमृत महोत्सव शिव सन्मान वसंत मगदूम यांना देण्यात आला.

पुढारी

# आव्हाने स्वीकारून यशस्वी करिअर घडवा

## सतेज पाटील; जयसिंगराव पवार, क्रांतिकुमार पाटील यांचा पुरस्काराने गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशात आगामी काळात ६० टक्के नोकऱ्या कमी होणार असल्याचे एका अहवालानुसार स्पष्ट झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगातील आव्हाने स्वीकारून यशस्वी करिअर घडवावे, विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन आ. सतेज पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे रविवारी विद्यापीठात शिव महोत्सव २०१९ झाला. आ. पाटील यांच्या हस्ते ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव जीवन गौरव' व प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना 'शिव ताराराणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे व शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

आ. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे नाव देशासह जागतिक पातळीवर पुढे जात असल्याचा कोल्हापूरकर म्हणून अभिमान आहे. सध्या ४.० इंडस्ट्रीयल रेव्हेल्युशन सुरू असून याचा परिणाम होणार आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉ. पवार म्हणाले, १९६४ रोजी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यामुळे इतिहास संशोधन क्षेत्रात आलो. शिवाजी विद्यापीठाला मोठा इतिहास आहे. हा इतिहास डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे नाव मोठे करावे. डॉ. पाटील म्हणाले, शिव महोत्सव पुरस्काराने नवीन ऊर्जा मिळेल. याप्रसंगी सागर चौरे, विकास मोहिते, शोभा पुरेकर, सतीश केसरकर, कैलास सोनवणे, संभाजी शिंदे, शिवाजी मोरे यांना शिव पुरस्कार, डॉ. रोहित कोळेकर यांचा शिव उद्योग पुरस्कार तर वसंतराव मगदूम यांना अमृत महोत्सव शिव सन्मानाने गौरविण्यात आले.

सागर बगाडे, ओंकार शेटे, दीपक बिडकर यांचा शिव सन्मान पुरस्कार तर संजय मोहिते, अमोल नाईक, अभिजित रोकडे यांना शिव कला सन्मान पुरस्कार देण्यात आला. सागर बगाडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन प्रा. सत्यजित कोसंबी यांनी केले. यावेळी डॉ. सरदार पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रोहित पाटील, मनसेचे जिल्हाध्यक्ष अभिजित राऊत, शहराध्यक्ष मंदार पाटील, कृती समितीचे डॉ. प्रवीण कोडोलीकर, डॉ. आर.जी.कोरबू आदी उपस्थित होते. पुरस्कार वितरण कार्यक्रमानंतर बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर : आ. सतेज पाटील यांच्या हस्ते ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव जीवन गौरव' व प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना 'शिव ताराराणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. डी. आर. मोरे, महेश काकडे, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. प्रवीण कोडोलीकर उपस्थित होते.**

### अपना भी टाईम आयेगा...

शिव महोत्सव कार्यक्रमात भाषणावेळी आ. सतेज पाटील यांनी एका हिंदी चित्रपटातील 'अपना भी टाईम आयेगा' हा डायलॉग सांगितला. यास उपस्थित विद्यार्थ्यांनी टाळ्या-शिट्यांची दाद दिली.

25 FEB 2019

पुढारी

# नावीन्यता हाच संशोधनाचा गाभा : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उच्च शिक्षणातील संशोधनाला फार महत्त्व आहे. नावीन्यता हा संशोधनाचा गाभा असतो. विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण बनवून जागतिकीकरणाला सामोरे जाण्यासाठी संशोधनाची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. संभाजी शिंदे यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजतर्फे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त विवेकानंद महोत्सव - शोध चैतन्याचा अंतर्गत आयोजित नावीन्यपूर्ण संशोधन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. प्रा. शिंदे म्हणाले, संशोधनामुळे मानव जीवनात वैज्ञानिक दष्टिकोन विकसित होतो व विज्ञाननिष्ठ समाज निर्माण होतो.

याप्रसंगी नावीन्यपूर्ण संशोधन व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. डॉ. के. पी. शिंदे, प्रा. एस. जी. कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन मनाली पाटील व मधुरा कुलकर्णी यांनी केले. डॉ. शुभांगी काळे, प्रा. कु. एम. एम. पुरोहित यांनी आभार मानले. यावेळी डॉ. के. ए. उंडाळे, डॉ. मिलिंद कारंजकर, प्रा. एच. पी. पाटील उपस्थित होते.

# विद्यापीठाचे नाव जगभर पोहोचवा

## डॉ. जयसिंगराव पवार : शिवमहोत्सव उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी जगभर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. येत्या काळात विद्यापीठातील आजी-माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे नाव जगभर पोहोचवावे, असे आवाहन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी रविवारी सायंकाळी केले. आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे आयोजित शिवमहोत्सवात ते बोलत होते. आ. सतेज पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार यांना शिव जीवनगौरव, तर प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना शिव ताराराणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लोककला केंद्रात महोत्सवाचे आयोजन केले होते.



**कोल्हापूर : आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे आयोजित शिवमहोत्सवात शिव जीवनगौरव पुरस्कार देऊन डॉ. जयसिंगराव पवार यांना सन्मानित करताना आ. सतेज पाटील. सोबत अन्य मान्यवर.** (छाया : एस. अली)

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, शिवाजी विद्यापीठातून १९६४ ला पदव्युत्तर पदवी घेतली. त्यामुळे विद्यापीठाचा सर्वात जुना विद्यार्थी आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात सन्मान होणे अभिमानास्पद आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी इतिहास संशोधन क्षेत्राकडे आणले नसते, तर मी दिसलो नसतो. हा पुरस्कार त्यांच्या स्मृतीला अर्पण करतो. 'विद्यापीठाच्या स्थापनेची संकल्पना छत्रपती राजाराम महाराज व प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांची असून, माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई यांच्या प्रयत्नातून त्याची स्थापना झाली आहे.

आ. सतेज पाटील म्हणाले, राष्ट्रीय, विद्यापीठाने जागतिक पातळीवर आपली मोहोर उमटवली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील अनेक रत्ने येथे घडली आहेत. त्यापैकीच एक असलेल्या डॉ. जयसिंगरव पवार यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती जगभरात पोहोचवली.

कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डी. आर. मोरे, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, कृती समितीचे अध्यक्ष प्रवीण कोडोलीकर, सुटाचे आर. जी. कोरबू, अभिजित राऊत, मंदार पाटील, चंद्रकांत कुंभार उपस्थित होते. सत्यजित कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले.

गुणवंतांचा सत्कार

शिवमहोत्सवात सागर बगाडे, ओंकार शेटे, दीपक बिडकर, सागर चौरे, विकास मोहिते, शोभा पुरेकर, सतीश केसरकर, दीपक काशीद, विजय माळी, कैलास सोनवणे, संभाजी शिंदे, शिवाजी मोरे, रोहित कोळेकर, वसंत मगदूम, नवनाथ गोरे, अमोल नाईक, अभिजित रोकडे, शशी बोराळकर, सचिन मांगले, युवक मित्रमंडळ, स. म. लोहिया हायस्कूलला यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सकाळ

# मतदान करणे हे राष्ट्रकार्यच



## कुलगुरू देवानंद शिंदे; आय विल वोट, 'सकाळ'-जिल्हा प्रशासनाचा उपक्रम

कोल्हापूर, ता. २४ : 'आपले नाव मतदार यादीत नोंद करा, नोंदणी केलेले मत 'दान' करणे, हे ही एक राष्ट्रकार्य आहे'. यासाठी 'सकाळ' आणि 'जिल्हा प्रशासन' मतदार नोंदणी आणि मतदान करण्यासाठी येत्या २ मार्चला 'आय विल वोट' (मी मतदान करणारच) या उपक्रमांतर्गत मानवी साखळीचे आयोजन केले आहे. यामध्ये महाविद्यालयीन तरुण-तरुणींसह सर्वच क्षेत्रांतील मान्यवरांनी सहभाग घेतला पाहिजे, असे आवाहन कुलगुरू देवानंद शिंदे यांनी केले आहे.



अमूक नेता जिंकला पाहिजे, अमूक नेत्याचे काम चांगले आहे, अशी चर्चा करणारे तरुण मतदार नोंदणी किंवा मतदानादिवशी मतदान करीत नाहीत, असा अनेकांना अनुभव येतो. एक-एक मतामुळेच देशातील लोकशाही भक्कम होते. याचा विचार करूनच 'सकाळ' आणि जिल्हा प्रशासन मतदान जनजागृतीसारखा आवश्यक उपक्रम घेत आहेत. २ मार्चला आमची रग्बीची टीम घेऊन यात सहभाग घेतोय, तुम्हीही सहभागी व्हावे.
- दीपक प्र. पाटील, प्रशिक्षक/सचिव, जिल्हा रग्बी असोसिएशन.



महाविद्यालयीन सर्वच विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मतदान नोंद करावे. एखादा फौजी सीमेवर कर्तव्य पार पाडून देशसेवा करतो. त्याचप्रमाणे आपणही मतदान करून आपले कर्तव्य पार पाडावे. मतदान नोंदविणे आणि मतदान करणे, हे राष्ट्रकार्य आहे. मतदान करूनही आपली देशभक्ती जोपासू शकतो. तरुण-तरुणी व महाविद्यालयीन विद्यार्थी 'सकाळ' आणि जिल्हा प्रशासन घेत असलेल्या मानवी साखळीत मोठ्या प्रमाणात सहभागी होतील. जिल्ह्यातील सर्वच महाविद्यालयांनी या मानवी साखळीत सहभागी व्हावे.
-देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

**नोंदणीसाठी संपर्क :** 'सकाळ' आणि जिल्हा प्रशासनच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करा. सुनील पाटील- ९९२२३१५५६६.

सकाळ

# विद्यापीठाचे नाव जागतिक पातळीवर न्या

## डॉ. जयसिंगराव पवार; 'शिवजीवन गौरव' प्रदान, डॉ. पाटील यांना शिव ताराराणी पुरस्कार

**कोल्हापूर, ता. २४ : 'माजी विद्यार्थ्यांचे कर्तृत्व लक्षात घेत, आजी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल करावे, असे आवाहन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या आजी माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे झालेल्या शिवमहोत्सवाप्रसंगी ते बोलत होते. आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार यांना शिवजीवन गौरव, तर प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना शिव ताराराणी पुरस्काराने आज सन्मानित केले. लोककला केंद्रात महोत्सवाचे आयोजन केले होते.

डॉ. पवार म्हणाले, ''विद्यापीठाचा मी सर्वांत जुना विद्यार्थी आहे. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर १९६४ ला पदव्युत्तर पदवी मी घेतली आहे. याच विद्यापीठाच्या प्रांगणात माझा सन्मान होत आहे, ही अभिमानास्पद बाब आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी इतिहास संशोधन क्षेत्राकडे आणले नसते तर मी दिसलो नसतो. हा पुरस्कार मी त्यांच्या स्मृतीला अर्पण करतो.''

सतेज पाटील म्हणाले, ''राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाने नाव कमावले आहे. कोल्हापूरच्या शैक्षणिक क्षेत्रातील रत्ने येथे घडली. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना जागतिक पातळीवर नेण्याचे काम डॉ. पवार यांनी केले आहे.''

डॉ. पाटील यांनी दिलेल्या पुरस्काराने पुढच्या काळात मला काम करण्याची ऊर्जा मिळाली आहे, असे सांगितले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कृती समितीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर, 'सुटा'चे आर. जी. कोरबू, चंद्रकांत कुंभार, अभिजित राऊत, मंदार पाटील उपस्थित होते. सत्यजित कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : शिवमहोत्सवात रविवारी शिव गौरव पुरस्काराने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंग पवार यांना सन्मानित करताना आमदार सतेज पाटील, तर शिवताराराणी पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील. शेजारी महेश काकडे, डॉ. प्रवीण कोडोलीकर, डॉ. डी. आर. मोरे, आर. जी. कोरबू, महेश पाटील, चंद्रकांत कुंभार.** (**मोहन मेस्त्री** : सकाळ छायाचित्रसेवा)

### अन्य पुरस्कार असे:

शिव सन्मान पुरस्काराने सागर बगाडे, ओंकार शेटे, दीपक बिडकर, शिव पुरस्कार सागर चौरे, विकास मोहिते, शोभा पुरेकर, सतीश केसरकर, दीपक काशीद, विजय माळी, कैलास सोनवणे, संभाजी शिंदे, शिवाजी मोरे,

शिव युवा उद्योग पुरस्कार रोहित कोळेकर, अमृत महोत्सव शिव सन्मान वसंत मगदूम, शिव ज्ञान ज्योत नवनाथ गोरे, शिव अभिमान जयोस्तुते पुरस्काराने युवक मित्र मंडळ व स. म. लोहिया हायस्कूलला सन्मानित केले. अमोल नाईक, अभिजित रोकडे, शशी बोराळकर, सचिन मांगले यांचा सत्कार झाला.

### आपणाभी टाईम आयेगा....

सध्याचा जमाना सोशल मीडियाचा असून, येत्या काही वर्षांत जगातील साठ टक्के नोकऱ्या कमी होणार आहेत. येणाऱ्या आव्हानांचा भावी पिढ्या यशस्वी सामना करत वाटचाल करतील, असे सांगत आमदार सतेज पाटील यांनी 'आपणाभी टाईम आयेगा,' असे स्पष्ट करताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

25 FEB 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा लौकिक जगभर वाढवावा

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे पवार यांचा 'शिव-जीवन गौरव'ने सन्मान







**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने दिला जाणारा 'शिव-जीवन गौरव' पुरस्कार ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना प्रदान करताना आमदार सतेज पाटील. यावेळी व्यासपिठावर उपस्थित परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डॉ. प्रविण कोडोलीकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. प्रकाश कुंभार, मंदार पाटील, रोहीत पाटील आदी. दुसऱ्या छायाचित्रात 'शिव-ताराराणी' पुरस्कार स्विकारताना ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील. तिसऱ्या छायाचित्रात सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्यविष्कार सादर करताना विद्यार्थी-विद्यार्थीनी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. हा इतिहास डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यकतृत्वाने जगभरात शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वाढवावा, असे आवाहन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने लोककला केंद्रात आयोजित 'शिव-महोत्सवा'चे आयोजन केले आहे. आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव-जीवन गौरव' तर ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना शिव-ताराराणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्काला उत्तर देताना ते बोलत होते.

श्वास अॅकॅडमी च्या कलाकारांनी गणेश वंदनेने कार्यक्रमाला सुरुवात केली. प्रथम पुलवामा येथील हुतात्मा जवानांना आदरांजली तर ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर आणि गायक कोणार्क शर्मा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

डॉ. पवार म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची पहिली पदवी मिळविलेला मी पहिला माजी विद्यार्थी आहे. छत्रपती राजाराम महाराज व डॉ. बाळकृष्ण यांच्या संकल्पनेतून आणि यशवंतराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून विद्यापीठाची स्थापना झाली. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्यामुळेच आज मी शाहू महाराजांचे संशोधन जगभर पोहचवू शकलो. त्यामुळे मला मिळालेला हा पुरस्कार मी डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या स्मृतीला अर्पण करतो. डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनीही पुरस्काराला उत्तर देताना सर्व सहकाऱ्यांच्या प्रयत्नामुळेच हा सन्मान मिळाल्याचे नमूद केले.

आमदार सतेज पाटील म्हणाले, सध्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने भविष्यात रोजगाराच्या संधी कमी होणार आहेत. या तंत्रज्ञानाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी तरुणांनी सज्ज झाले पाहिजे. जगभरात विद्यापीठाचे नाव रोषण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे. सत्यजित कोसबी आणि सागर बगाडे यांनी सुत्रसंचालन केले.

डॉ. प्रविण कोडोलीकर यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते.

### सांस्कृतिक कार्यक्रमात शिट्यांनी दाद....

सांस्कृतिक कार्यक्रमात रसूल भाई मुल्लाणी यांनी बासरी वादन केले. राजरामियन ग्रुपने अजय-अतुलची गाणी सादर केली. सार्थक क्रिएशनतर्फे फर्जद नृत्य सादर केले. भूषण साठम याने गिटार वादनाने उपस्थितांची मने जिंकली. अमित माळकरी याने सँड आर्ट सादर केले. अभिजित रोकडे याने स्टँड अप कॉमेडी यासह विविध कला आविष्काराचे सादरीकरण केले. बी ऑन इट ग्रुपने सादर केलेल्या नृत्याविष्काराला प्रेक्षकांनी टाळ्या व शिट्यांनी दाद दिली.